REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील व्यवस्थापक चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ.
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २९ मार्च, १९४४ अंक १३

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

विनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः—
माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः—
पूना गेस्ट हाऊस, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून मग्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कधींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. मरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वस्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# प्रगतिपथावर—

नवीन काम

१९४२ – रु. २२,९३,९८३

१९४३ – रु. ३९,२५,०००

नवीन कामांत ७०% वाढ

एकंदर चालू विमे

रु. १,५५,००,०००

हप्त्यांचें उत्पन्न

रु. ९,४०,००० वर

## धि बॉम्बे कोऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि.

अध्यक्षः—शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजरः—श्री. जी. एच. ठाकोर, एम्. ए. (कॅंटाब.)
मुख्य कचेरीः—कोऑपरेटिव्ह इन्शुअरन्स बिल्डिंग, सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई
महाराष्ट्र व कर्णाटकचे चीफ ऑर्गनायझर्सः
मेसर्स कुळकर्णी आणि कं., मुंबई


## विविध माहिती

### हुंडा घेणें गुन्हा, परंतु देणें हा गुन्हा नाहीं

हुंड्याच्या पद्धतीस आळा घालण्यासाठीं सिंध सरकारनें एक कायदा केला आहे, त्या अन्वयें हुंडा घेणें बेकायदा ठरविण्यांत आलें आहे. विवाहापूर्वी ३ वर्षे किंवा त्यानंतर ३ वर्षेपर्यंत वधूच्या पक्षाकडून बक्षीस स्वीकारणें हा त्यामुळें गुन्हा ठरत आहे. हुंडा देणें हा मात्र गुन्हा नाहीं.

### वोल्टास लि., मुंबई

वरील कंपनीनें आपला सुवर्णमहोत्सव नुकताच साजरा केला.

### ब्रिटिश सैनिकांची पगारवाढ

ग्रेट ब्रिटनच्या सैनिकांचा पगार वाढवून तो अमेरिकन व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत इतर देशांच्या सैनिकांच्या पगाराचे बरोबर करावा, अशी मागणी पार्लमेंटांत करण्यांत आली. ही मागणी सरकारनें मान्य केल्यास वार्षिक ४० कोटि पौंडांची तरतूद करावी लागेल व त्यासाठीं भरमसाट चलनवृद्धी करण्याची पाळी येईल, असें युद्धमंत्री म्हणाले. तथापि, ह्या प्रश्नाचा विचार करण्याचें आश्वासन सभागृहाचे नेते, मि. ईडन, ह्यांनीं दिलें.

### बंगालमधील १९४३ मधील मृत्यु

बंगालमध्यें १९४३ सालीं एकूण १८ लक्ष, ७४ हजार मृत्यु घडून आले. त्या पूर्वीच्या पांच वर्षांच्या सरासरीचे मानानें हा आंकडा ५८% नें मोठा आहे. म्हणजे सरासरीपेक्षा ६ लक्ष, ८९ हजार मृत्यु जास्त झाले.

### युद्ध प्रयत्नाची प्रगति

मुंबई प्रांतांतील मध्य भागांतील जानेवारी, १९४४ पर्यंतचे आंकडे:—

| जिल्हा | युद्धफंड रु. | रेडक्रॉस फंड रु. | डिफेन्स सर्टिफिकिटें | ३% युद्ध कर्जरोखे रु. | बिन व्याजाचे रोखे |
|---|---|---|---|---|---|
| नगर | ... | १६ | ... | ४०० | ... |
| पू. खानदेश | ५२ | ४ | ... | १०,००० | ... |
| प. खानदेश | २०१ | ७,६०० | ... | ... | ... |
| नाशिक | ११ | १,९४,४०९ | ... | ... | ... |
| पुणें | १०९ | ३१ | ... | २१,००० | ... |
| सातारा | १०८ | ६,११८ | ... | ... | ... |
| सोलापूर | ३४ | ३२ | ... | ५०० | ... |

### युद्धमंडळावर काश्मीरचे महाराज

हिंदुस्थानाचे प्रतिनिधि म्हणून सर फिरोझखान नून ह्यांचे बरोबर युद्धमंडळावर काम करण्यास येण्याबद्दल विनंति व्हाइसरॉयांनीं काश्मीरच्या महाराजांस केली, ती त्यांनीं मान्य केली आहे.

### अमेरिकेचा आशिया खंडाशीं व्यापार वाढणार

येत्या शतकांत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे दृष्टीनें रशिया, आशिया व दक्षिण अमेरिका हे प्रदेश फार महत्त्वाचे होतील. रशिया व आशिया ह्यांतील लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या निम्मी भरेल. अमेरिकन मालाची वहातुक मुख्यतः अटलांटिक महासागर ओलांडूनच आतांपर्यंत होत असे; ह्यापुढें पॅसिफिक महासागरास महत्त्व येणार. अमेरिकेचे व्हाइस प्रेसिडेंट, मि. वॅलेस, ह्यांचेंच असें म्हणणें आहे.

### अमेरिकेचें विमानांचें उत्पादन

अमेरिकेंत आतां दररोज ३५० विमानांचें उत्पादन होऊं लागलें आहे.

### ट्रॅक्टर्सची आयात

हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेकडून १०० ट्रॅक्टर्स मागविले आहेत, त्यांपैकीं ४ ट्रॅक्टर्स मद्रास सरकार घेणार आहे.

### रेशनिंगच्या योजनेंत २३ कोटि लोकांचा समावेश

हिंदुस्थानांत सध्या १३३ शहरांत रेशनिंग सुरू आहे व २३ कोटि लोक आतां प्रमाणित वाटपाच्या योजनेप्रमाणें अन्न खात आहेत.

### ब्रह्मदेशांतील तांदळाचा धंदा

ब्रह्मदेशांतील तांदुळाच्या धंद्याचें पुनः बस्तान बसविण्याची योजना आंखण्याचें काम ब्रह्मदेशाच्या सरकारनें नेमलेली एक कमिटी सिमला येथें करीत आहे.

### अमेरिका-हिंदुस्थान वैमानिक वहातुक

अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें वक्तशीर वैमानिक वहातुक १६ नोव्हेंबर १९४३ पासून सुरू आहे. येण्या-जाण्याचें २८ हजार मैलांचें अंतर तोडण्यास ८ दिवस पुरतात व दर आठवड्यास अशा कित्येक सफरी होतात. विमानांच्या हुड्या भागासारख्या अत्यंत जरूरीच्या मोठी विमानांतून हिंदुस्थानांत येतात व परत जातांना तीं विमानें जखमी अमेरिकन सैनिक व सल्लामसलतीसाठीं अमेरिकेस जाणारे लष्करी अधिकारी ह्यांना घेऊन जातात.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ९८ | ६ के. रामदास पंटलु ... | १०२ |
| २ शेतकरी कर्ज विमोचन | ९९ | ७ माताचें पीक ... | १०२ |
| ३ पिकांवरील कर्जांची सहकारी व्यवस्था ... | ९९ | ८ पुणें सें. बँक ... | १०३ |
| ४ कागद करण्याचा ग्रामोद्योग ... ... | १०० | ९ डे. जि. को. के. सोसायटी ... ... | १०३ |
| ५ स्फुट विचार ... | १०१ | १० ग्रेटब्रिटनमधलि येण्याची वसुली ... ... | १०३ |
| धान्य खरेदी—वाटणीची योजना-धान्य चतुःसूत्रीची अंमलबजावणी — जर्मन सुधारणा योजना कायद्यांत दुरुस्ती. | | ११ कपाशीच्या स. वि. सोसायट्या ... ... | १०३ |
| | | १२ अ. भा. चरखा संघ | १०४ |



# अर्थ

बुधवार, ता. २९ मार्च, १९४४


## शेतकरी कर्ज-विमोचन

ह्या प्रांतांतील शेतकऱ्यांच्या डोक्यावर चढलेल्या कर्जाचा बोजा हलका करून त्यांस आपल्या पोटाचा धंदा किफायतशीरपणानें चालवतां यावा ह्या हेतूनें मुंबई सरकारानें केलेला कायदा कांहीं निवडक तालुक्यांत प्रयोगादाखल अंमलांत आणण्यांत आला आहे. कर्जफेडीच्या शेतकऱ्यांच्या सामर्थ्याचे मर्यादेंत त्यांचें देणें आणावयाचें आणि ह्या हलक्या केलेल्या कर्जाची फेड हप्तेबंदीनें होण्याची व्यवस्था करणें हें त्या कायद्याचें मुख्य कार्य आहे. न्यायदानाचा अनुभव असलेल्या लोकांकडून कर्जाची व ऋणकोंच्या पात्रतेची छाननी केली जाते आणि अखेरचा निर्णय दिला जातो. कांहीं काळाच्या अवधींत कर्ज-विमोचन कायद्याच्या अंमलबजावणीचा आलेला अनुभव लक्षांत घेऊन त्यामध्यें इष्ट वाटणाऱ्या दुरुस्त्या करणें आणि तो प्रांताच्या इतर भागांत लागू करणें हे प्रश्न सरकारापुढें होते. कायद्याच्या आतांपर्यंतच्या अनुभवाची व अडचणींची चौकशी सरकारनें दोन तज्ञांकडून करून घेतली आणि त्यांच्या सूचनांस अनुसरून कायद्यांत विशिष्ट दुरुस्त्या करावयाचें ठरलें. ह्या दुरुस्त्यांचा विचार एका लहान समितीनें केला आणि त्यासंबंधांतला आपला अभिप्राय व्यक्त केला. त्यानंतर हें सर्व प्रकरण प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डापुढें नुकत्याच भरलेल्या सभेंत त्याचें मत अजमावण्यासाठीं सरकारनें मांडलें. युद्ध परिस्थितींत शेतीच्या मालाच्या किंमती चढल्या आहेत त्यांचा फायदा शेतकऱ्यांस मिळावा ह्या उद्देशानें प्रचलित कायद्यांत कांहीं बदल सुचवण्यांत आले आहेत. त्यांमध्यें, कमी करण्यांत येणाऱ्या कर्जाच्या रकमेची फेड ज्या हप्त्यांनीं व्हावयाची त्यांची संख्या मर्यादित केली जावी अशी एक सूचना आहे. आपलें देणें जितक्या लवकर देऊन टाकतां येईल तितक्या लवकर शेतकऱ्यांस तें फेडतां यावें आणि शेतमालाच्या अनुकूल भावाचा त्यांस ह्या कामीं पूर्ण फायदा घेतां यावा हा सदरहू सूचनेचा हेतु आहे. कर्जदारास आपलें देणें सोयीनें व सुलभतेनें देतां यावें ह्यासाठी हप्तेबंदी असते, पण कमी हप्त्यांत हें त्यास करतां आलें तर कर्जविमोचन लवकर होतें ही गोष्ट इष्ट आहे. तथापि, कमी हप्ते म्हणजे प्रत्येक हप्ता मोठ्या रकमेचा आणि शेतमालाच्या किंमती चांगल्या येतील तोंवरच ही रक्कम सोयीनें देण्याची शक्यता, हें उघड आहे. दोनचार वर्षांत परिस्थिति-चक्राच्या फेऱ्यांत बाजारभाव उतरल्यास मोठे हप्ते डोईजड वाटल्यावांचून रहावयाचे नाहींत, ह्या दृष्टीनें प्रसंग आल्यास हप्तेबंदीची मुदत वाढवण्याचा अधिकार सरकारला कायद्यानें द्यावा अशी सूचना रूरल बोर्डाच्या सभेंत करण्यांत आली ती योग्य आहे. कर्ज-विमोचनाच्या कायद्याची अंमलबजावणी प्रांताच्या सर्व भागांस लागू करण्यांत येण्याचें महत्त्वहि सरकारच्या ध्यानांत येईल अशी आशा आहे.

शेतकरी वर्गाच्या ऋणमुक्ततेच्या संबंधांत, ज्यांचीं कर्जें ऐपतीच्या आटोक्यांत आणलीं जातील अशा शेतकऱ्यांस पिकें काढण्यासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलाचा पुरवठा होण्याबाबतचा प्रश्न उभा रहातो. जुन्या कर्जाचा हप्ता आणि नवीन घेतलेलें पिकाच्या तारणावरचें खेळत्या भांडवलाचें कर्ज यांची फेड वार्षिक पिकाच्या उत्पन्नामधून व्हावयाची असते. खेळतें भांडवल देणारी संस्था किंवा व्यक्ती हिचा अग्रहक्क वार्षिक पिकावर असतो आणि त्याची वासलात लावण्याच्या शेतकऱ्याच्या स्वातंत्र्यावर धनकोच्या हितसंरक्षणार्थ कायदेशीर निर्बंध घालण्यांत आले आहेत. पिकाच्या तारणावरील चालू भांडवलाचें कर्ज शेतकऱ्यांस बेताच्या व्याजानें मिळालें नाहीं तर शेतीचा धंदा चालण्याचे मार्गांत व्यत्यय येऊन कर्जमुक्ततेचा कायदा विफल होईल. ह्याकरितां शेतीच्या चालू खर्चासाठीं शेतकऱ्यांस कर्ज मिळण्याचें खास महत्त्व आहे. सहकारी संस्थांनीं पिकाच्या तारणावर ऋणमुक्त झालेल्या शेतकऱ्यांस कर्ज देण्याचें काम स्वतःकडे घ्यावें, अशी इच्छा मुंबई सरकारच्या जबाबदार मंत्र्यांनीं व अधिकाऱ्यांनीं अनेक वेळां व्यक्त केलेली आहे. सहकारी संस्थांनींहि शेतकऱ्यांस कर्जें देऊन त्यांस सहाय करण्याची कामगिरी आपले क्षेत्रांत पडत असल्यानें ती उचलण्याची तयारी दर्शविली आहे.

## पिकांवरील कर्जाची सहकारी व्यवस्था

कर्जनिवारण आणि कर्जफेडीची सोयीची हप्तेबंदी ह्यांची व्यवस्था लागल्यावर शेतकरी पुन्हां कर्जबाजारीपणाच्या खड्ड्यांत आणि सावकाराच्या जाळ्यांत सांपडूं नयेत ह्यासाठी सरकारनें सावकारी नियंत्रणाचा कायदा तात्काळ करावा असें रूरल बोर्डानें सुचवलें आहे. बहुतेक सर्व प्रांतांत अशा प्रकारचे कायदे आतां अमलांत आहेत. मुंबईमध्यें सावकारी नियमनाच्या कायद्याचा मसुदा विधिमंडळापुढें मांडण्यापर्यंत प्रांतिक सरकारची मजल गेली होती, पण त्याची प्रगति तेथेंच कुंठित झाली. तें प्रकरण सरकारनें पुन्हां हातीं घेणें कर्जनिवारण कायद्याच्या यशस्वीपणाच्या दृष्टीनें अगत्याचें आहे ह्यांत मुळींच संशय नाहीं. सहकारी पद्धतीनें कर्जें दिलीं गेलीं आणि वसूल केलीं गेलीं असतां शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचें योग्य रक्षण होऊन तो वर्ग शिक्षित, कार्यक्षम व स्वावलंबी होऊं शकतो. ह्यासाठीं कर्जनिवारणाच्या कायद्यास अनुसरून ज्यांस हप्तेबंदी मिळेल अशा शेतकऱ्यांस लागणाऱ्या चालू भांडवलाची आणि त्यांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था सहकारी संस्थांच्या मार्फत होणें इष्ट आहे.

अशा हजारों शेतकऱ्यांची सोय आतां करावी लागणार आहे आणि त्यासंबंधांतली सर्व तयारी सहकारी संस्थांनी केली पाहिजे. हें मोठ्या जबाबदारीचें आणि प्रचंड कार्य आहे आणि तें पतपेढ्या व मध्यवर्ती बँका ह्यांनीं केलें पाहिजे. सहकारी बँकांच्या असोसिएशनच्या सभेनें चालू महिन्याचे प्रारंभीं त्या प्रश्नाची रजिस्ट्रारांच्या समवेत विस्तृत चर्चा केली. हलक्या व्याजाच्या दरानें बँकांनीं पतपेढ्यांस "पीक कर्जे" द्यावीं आणि त्या सवलतीचा फायदा सोसायट्यांनीं स्वतःच्या सभासदांस द्यावा ह्याविषयीं एकमत सभेंत झालें. तथापि कर्जें देण्याच्या व्यवहाराचा विस्तार होईल तेव्हां बँकांस अधिक खेळतें भांडवल लागण्याचा संभव आहे आणि परिस्थिति पुढें-मागें प्रतिकूल झाल्यास त्यांत नुकसानहि येईल. भांडवल-पुरवठा व अंशतः नुकसानभरपाई ह्यांचे बाबतींत बँकांस सरकारनें सहाय देणें योग्य व आवश्यक आहे. तसेंच, कर्जदार सभासदांच्या मालाची विक्री सोसायट्यांस करतां यावी म्हणूनहि त्यांस सरकारचें सहाय लागेल. एका बाजूनें कर्जावरील व्याजाचा दर कमी करणें आणि दुसऱ्या बाजूनें देखरेख व मालविक्री ह्यांचेसंबंधांत अधिक खर्च करणें ह्या दुहेरी ताणाच्या तडाख्यांत बँका सांपडतील. तेव्हां, आपले व्यवहार त्यांस सुरळीत रीतीनें चालवतां यावे म्हणून सरकारच्या मदतीची विशेष आवश्यकता असल्याचें बँक्स असोसिएशननें स्पष्ट केलें आहे. सहकारी संघटनेचा पद्धतशीर विस्तार आणि शेतकरी वर्गाच्या आर्थिक स्थितींत सुधारणा होण्याचें अगत्य ह्या दोन्ही दृष्टींनीं सरकारनें सहकारी बँका व सोसायट्या ह्यांस आवश्यक असलेलें सर्व प्रकारचें सहाय दिलें पाहिजे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेमध्यें सहकारी संस्थांस अग्रतेचें स्थान दिलें जाणें योग्य व अपरिहार्य आहे. खेडेगांवांच्या सुधारणेवर मनुष्यबळ आणि द्रव्यबळ मोठ्या प्रमाणांत ह्यापुढें खर्चावें लागणार आहे आणि सहकार व सरकार ह्यांचें हार्दिक परस्पर सहाय होईल तर मोठा कार्यभाग घडून येणार आहे. मुंबई सरकार प्रस्तुत प्रश्नाकडे व्यावहारिक सहानुभूतीनें पहात आहे असें समजतें आणि ती फलद्रूप होऊन शेतीच्या सहकारी संघटनाचें पाऊल जोरानें पुढें पडेल अशी आशा व्यक्त करण्यास हरकत नाहीं.

---

### श्री. आपटे ह्यांची अभिनंदनीय निवडणूक

रूरल प्रॉडक्ट्स कं. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. न. म. आपटे, बी. एजी., एम. एस. सी., ह्यांची इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बोर्डावर फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजतर्फे पुढील तीन वर्षांकरितां ४६ पैकीं २६ मतें मिळून नुकतीच फेरनिवडणूक झाली. श्री. आपटे ह्यांनीं गेल्या तीन वर्षांत गव्हर्निंग बोर्डांत केलेली कामगिरी हिंदुस्थानांतील व्यापारी व कारखानदार संघांना पसंत पडल्याचा हा दाखला आहे.

### हॉटेलांत उतरणारांवर नियंत्रण

हॉटेलांत उतरणाऱ्या लोकांनीं पांच दिवसांपेक्षा अधिक काळ हॉटेलांत राहूं नये, अशा प्रकारचें नियंत्रण अमेरिकेंत घालण्यांत येणार आहे असें समजतें. युद्धजन्य गर्दीमुळें असें नियंत्रण आवश्यक झालें आहे. जरूरीचें काम असणारांना प्राधान्य मिळणार आहे.

## कागद करण्याचा ग्रामोद्योग*

हातानें कागद बनविण्याचा धंदा हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून चालत आलेला असला, तरी यंत्रांचे सहायानें तयार होणारा कागद मोठ्या प्रमाणावर आयात होऊं लागल्यापासून हा धंदा बसला. अखिल भारत ग्रामोद्योग संघाची १९३४ सालीं स्थापना झाल्यानंतर, त्यानें कागदाच्या धंद्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न हातीं घेतला. प्रथम वर्धा येथें प्रयोग व उत्पादन केंद्र होतें व त्यानंतर पुणें येथील केंद्रांत मोठ्या प्रमाणावर ते प्रयत्न चालू झाले. श्री. के. बी. जोशी ह्यांनीं दीर्घ काळ कागद करण्याच्या संशोधनास व प्रसारास वाहून घेतलेलें असून त्याचे ते तज्ज्ञ आहेत. हातानें कागद करण्याच्या क्रिया, त्यास लागणारीं साधनें, इत्यादींचें सविस्तर वर्णन करणारें त्यांचें पुस्तक १९२८ मध्यें प्रथम प्रसिद्ध झालें. त्यानंतर संशोधनांत आलेल्या अनुभवांस अनुसरून (उ. रांधा करण्यासाठीं यांत्रिक शक्तीचा उपयोग) अधिकाधिक माहिती जमूं लागली, तिचा उपयोग पुस्तकाच्या नव्या नव्या आवृत्तींत करण्यांत आला. १९३९ सालीं पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली, तिचें १९४१ सालीं पुनर्मुद्रण झालें, १९४२ सालीं तिसरी आवृत्ति निघाली व चवथी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळें हातकागदाकडे सरकारचें व लोकांचें विशेष लक्ष वेधलें गेलें व युद्ध समाप्तीनंतरहि हात कागदास मागणी राहून ह्या धंद्याचा चांगला विस्तार होऊं शकेल, असा आतां विश्वास निर्माण झाला आहे. अ. भा. ग्रामोद्योग संघाचें व्यापक कार्य व श्री. जोशी ह्यांचे तज्ज्ञ देखरेखीखालील निष्ठेचे प्रयत्न ह्यांचाच हा परिणाम आहे.

श्री. जोशी ह्यांनीं प्रस्तुत पुस्तकांत प्रथम हातकागदाच्या सणांची माहिती देऊन त्यांवर करावयाच्या रासायनिक व इतर क्रिया वर्णिल्या आहेत. रद्दी कागद, चिंध्या, बांबू, गवत, अंबाडी, इत्यादि प्रथम स्वच्छ करून व कापून ते रासायनिक व इतर क्रियांसाठीं तयार करावे लागतात व त्यांचें रांध्यांत रूपांतर करावें लागतें. आतांपर्यंतचें हें विध्वंसक कार्य म्हणतां येईल व येथून पुढें कागद तयार होण्यास प्रारंभ होतो. कागदाचा तक्ता तयार करणें, त्यानें पाणी खाऊं नये म्हणून त्यावर कळप करणें, कागद गुळगुळीत करणें व त्याचे योग्य आकाराचे तुकडे कापणें, ह्या त्यानंतरच्या क्रिया होत. ह्या सर्व क्रियांचे, वेगवेगळ्या प्रकारच्या कागदांच्या बाबतींत तपशीलवार, तांत्रिक व व्यावहारिक वर्णन श्री. जोशी ह्यांनीं केलें आहे व जरूर तेथें चित्रें, नकाशे व फोटो भरपूर दिले आहेत. उत्पादनाचे संबंधांतील इतर बाबींचीहि सर्व सामान्य माहिती, (कारखान्याची जागा, पाणी, उत्पादनाचा हिशेब) त्यांनीं दिली आहे. हातकागदाच्या धंद्यास प्रारंभ करूं इच्छिणारांस प्रस्तुत पुस्तक अत्यंत उपयोगी व मार्गदर्शक होईल. ग्रामोद्योगाच्या अभ्यासू लोकांनाहि पुस्तक मननीय वाटेल.

---

* Paper Making (as a Cottaege Industry) लेखकः— के. बी. जोशी, पुणें येथें तयार झालेल्या हातकागदावर छापलें. अ. भा. ग्रा. संघाचें प्रकाशन, पृ. सं. २२६, किं. ४ रु.

# स्फुट विचार

## धान्य खरेदी-वाटणीची नवी सरकारी योजना

मुंबई प्रांतांत धान्याची वाटणी योग्य मापानें व लोकांच्या गरजेप्रमाणें सुरळीत व्हावी ह्या हेतूनें सरकारनें उत्पादनाच्या विशिष्ट प्रमाणांत स्वतः खरीपाची पिकें जमा करून तीं बाजारांत जनतेस विकत मिळावी अशी व्यवस्था अमलांत आणली होती. सरकारी धान्य खरेदीची ही योजना सक्तीची नसल्यामुळें मोठे जमीनदार व शेतकरी ह्यांचेकडून अपेक्षेस अनुसरून धान्य मिळालें नाहीं आणि ती पुष्कळांशीं अयशस्वी झाली. सरकारला कल्पनेइतकें धान्य जमा करतां आलें नाहीं आणि "काळ्या बाजारा"ची चलती चालू राहिली. धान्याचा सरकारचा साठा मोठा असेल तरच त्यास बाजारभाव स्थिर ठेवतां येतील आणि धान्याची समान वाटणी करतां येईल, असा गेल्या खरीपाच्या पिकांचे संबंधांत अनुभव आला. धान्य पिकवणाऱ्या खेडेगावांतच त्यांची टंचाई झाली आणि अनेक कुटुंबांस धान्य मिळेनासें झालें. धान्य पुरवठ्याचें नियमन सरकारनें करावयाचेंच तर तें अर्धवट होऊन चालत नाहीं, तें पूर्णत्वानें झालें पाहिजे असा बोध अनुभवानें शिकवला. ह्यावरून सरकारनें आतां नवी आणि सक्तीची योजना निश्चित केली असून तिच्या अंमलबजावणीस प्रारंभहि झाला आहे. नवीन व्यवस्थेचीं चार अंगें आहेत:—(१) पीक करणाराकडून सक्तीनें आणि निश्चित प्रमाणात सरकार धान्य खरेदी करील, (२) जमीनदार व शेतकरी ह्यांचेकडून ह्या रीतीनें धान्य गोळा झाल्यावर त्यांस शिलकी मालांतून कांहींची विक्री करणें असल्यास तो माल सरकारकडून किंवा त्यांच्या मार्फतच खरीदला जाईल, वाटेल त्यांस तो विकत घेतां येणार नाहीं, (३) धान्याच्या जागेवर सरकारचें सक्त नियंत्रण राहील आणि (४) शहरांत व खेडेगावांमध्यें धान्याची वाटणी सरकारमार्फतच होईल.

---

## धान्य चतुःसूत्रीची अंमलबजावणी

शेतकऱ्यांकडून सक्तीनें धान्य सरकारनें त्यांच्या पैदाशीच्या कोणत्या प्रमाणांत घ्यावें? प्रत्येक शेतांत प्रत्यक्ष पिकलेल्या धान्याचा हिशेब करून त्याचा ठराविक अंश गोळा करावयाचा असें म्हटलें तर या कामांत अनिश्चितपणा व गोंधळ उद्भवण्याचा संभव रहातो. जमीन महसुलाच्या विशिष्ट प्रमाणांत धान्य घेण्याची पद्धति ह्याकरितां सरकारनें योजिली आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबास सरासरीनें वर्षाकाठीं २७½ मण धान्य लागतें असा हिशेब करून ह्या मर्यादेपर्यंतच्या धान्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जाणार नाहीं. ह्या मर्यादेपेक्षा अधिक धान्य पिकवणारांकडून वाढत्या प्रमाणांत म्हणजे ज्या मानानें पीक ज्यास्त त्या मानानें सरकारी खरेदी ज्यास्त ह्या हिशेबानें धान्य घेतलें जाईल. धान्य देण्यास वाव अधिक तसा सरकारनें घ्यावयाचा हिस्सा अधिक असें हें तत्त्व लहान व मध्यम स्थितींतल्या शेतकऱ्यांस सोयीचें व न्यायाचें होईल. शेतसारा आणि आणेवारी ह्यांच्या सहाय्यानें निरनिराळ्या भागांत आणि खेड्यांत पिकांचा मगदूर व सरकारनें घ्यावयाचा धान्याचा अंश ठरवण्यांत येणार आहे. प्रत्येक टापूच्या परिस्थितीस अनुसरून धान्याचा साठा, त्याची ने-आण व खरेदीविक्री हीं समाधानकारक रीतीनें होतील अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी अर्थातच सरकारवर पडते आणि ती त्यानें स्वीकारली आहे. बिगरशेतकरी लोकांस खेडेगांवामध्यें धान्य मिळण्यास अडचण पडते, त्यांचे खरेदीसाठीं खास दुकानांची तरतूद करावी लागेल आणि धान्याचा पुरवठा जेथें अपुरा असेल तेथें तो पुरा करणें आवश्यक होईल. ह्या कार्यक्रमाच्या मार्गांत अडचणी येणें अपरिहार्य आहे. त्या दूर होण्याची व्यवस्था सरकारनें करणें अगत्याचें आहे आणि त्याकामीं लोकांची सहानुभूति त्यानें मिळवली पाहिजे. प्रस्तुत नवी योजना सोलापूर, विजापूर आणि अहमदनगर ह्या जिल्ह्यांतील रबीच्या पिकांस तात्काळ लागू केली जात आहे. पुढील खरीपाच्या पिकांचे बाबतींत प्रांताच्या सर्व भागांत तिची अंमलबजावणी केली जाईल. तिची यशस्वितता सरकारी अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि तितक्याच प्रमाणांत जनतेच्या सहकार्यावर अवलंबून राहील. हा सर्वांसच जिव्हाळ्याचा असा हा प्रश्न आहे आणि तो त्यांनीं परस्पर सहाय्याच्या भूमिकेवरून सोडवला पाहिजे. लोकांच्या अडचणी सरकारच्या कानांवर घालण्यांत आल्या आहेत आणि त्या त्यास माहीतहि आहेत. आतांपर्यंतच्या अनुभवाचा फायदा त्या दूर करण्यांत घेतला जाणें इष्ट आहे. शहरें व खेडीं, शेतकरी व बिगरशेतकरी ह्या सर्वांचे हितसंबंध प्रस्तुत योजनेंत गोंवलेले असल्यानें ती यशस्वी होणें अत्यंत महत्त्वाचें आहे.

---

## जमीन सुधारणा योजना कायद्यांत दुरुस्ती

बॉंबे लँड इंप्रूव्हमेंट स्कीम्स ॲक्ट (१९४२) मध्यें कांहीं दुरुस्त्या सुचविणाऱ्या एका बिलाचा खर्डा मुंबई सरकारनें प्रसिद्ध केला आहे. जमीन सुधारणेच्या योजनांचा अधिकांत अधिक फायदा मिळावा ह्या दृष्टीनें योजनांस पोषक असे कांहीं नियम करून ते अमलांत आणणें इष्ट आहे, असें अनुभवांती सरकारचें मत झालें आहे. वरील कायद्यान्वयें केलेलीं कामें दुरुस्तींत राखण्याची जबाबदारी जमिनींच्या मालकांवर टाकण्यांत आलेली आहे, परंतु जमीन मालकांनीं ती पार पाडली नाहीं, तर कलेक्टर हें काम कोणाकडूनहि करवून घेऊं शकतो व त्याचा खर्चहि वसूल करून घेण्याचा कलेक्टरास अधिकार आहे. तथापि, खर्चाच्या वसुलीबरोबर कांहीं दंडहि त्या जमीनमालकांवर लावला जाणें आवश्यक आहे. त्यामुळें जमिनींच्या मालकांच्या जमीन सुधारणेच्या दुरुस्तीबाबत आपल्या कामांत दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसण्यास मदत होईल, ह्या हेतूनें कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यांत येत आहे. सरकारनें केलेल्या योजनेवरील खर्चाच्या बाकी हप्त्यांची वसुली सरकारी साऱ्याप्रमाणें वसूल करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास देण्याची तरतूदहि बिलाच्या खर्ड्यांत केली आहे. दुष्काळ पडलेल्या किंवा जेथें दुष्काळ पडण्याचा संभव आहे, अशा ठिकाणीं जमीन सुधाराईची योजना अंमलांत आणण्याचा मुंबई सरकारास अधिकार आज आहे. प्रांतिक सरकारांकडून मदत मिळणाऱ्या योजना, एखाद्या ट्रस्टच्या देणगींतून चाललेल्या योजना, लष्करी सैनिकांच्या हितासाठीं चालू केलेल्या योजना, इत्यादींचे संबंधांतहि वरील अधिकार लागू पडावा, ह्या दृष्टीनें कायद्यांत सुधारणा सुचविलेली आहे. सध्याच्या कायद्यांतील जमीन सुधारणेच्या योजना पार पाडण्यासंबंधींचे नियम लहान तुटक प्रदेशांचे दृष्टीनें केलेले आहेत; तथापि मोठ्या व्यापक योजनांची अंमलबजावणी प्रारंभीं सरकारी खर्चानेंच करणें सोईस्कर पडतं असा अनुभव आहे. जमीन मालकाच्या वाट्याच्या खर्चाचा हिस्सा मागाहून वार्षिक हप्त्यांनीं वसूल करण्याची सवड कायद्यांत असणें आवश्यक आहे व त्यासाठीं दुरुस्ती करण्यांत येत आहे.

### श्री. रामदास पंटलु ह्यांचें खेदकारक निधन

मद्रासचे श्री. रामदास पंटलु ह्यांची प्रकृति गेलीं दोन-तीन वर्षें सारखीच खालावत चालली होती आणि त्यांचें नुकतेंच देहावसान झालें हें ऐकून हिंदुस्थानच्या सर्व भागांतील सहकारी कार्यकर्त्यांस दुःख झाल्यावांचून रहाणार नाहीं. सर लल्लुभाई सामळदास ह्यांच्या निधनानंतर हिंदी सहकारी संघटनेच्या नेतृत्वाची धुरा श्री. रामदास ह्यांनी उचलली होती आणि तें कार्य त्यांनीं शेवटच्या क्षणापर्यंत निष्ठेनें व उत्साहानें पार पाडलें. अखिल भारतीय सहकारी इंस्टिट्यूटस आणि प्रांतिक बँका ह्यांच्या मध्यवर्ती मंडळाचे ते अध्यक्ष होते आणि सहकारी संघटनाविषयींच्या प्रश्नांचा अभ्यास व माहिती ह्यांचे बाबतींत त्यांचा हात धरणारा सबंद हिंदुस्थानांत कोणीहि नव्हता. थोड्याच वर्षांमागें आंतरराष्ट्रीय सहकारी परिषदेच्या कार्यक्रमांत भाग घेण्यासाठीं ते इंग्लंडला गेले होते. अनेक प्रांतिक सहकारी परिषदांचे अध्यक्ष या नात्यानें श्री. रामदास ह्यांनीं प्रांतिक सहकारी संघटना संबंधानें उपयुक्त भाषणें केलीं आहेत आणि त्यांच्या सल्ल्याचा फायदा सर्व हिंदुस्थानभर लोकांस मिळालेला आहे. अखिल भारतीय सहकारी त्रैमासिकाचे ते संपादक होते आणि सबंद देशांतील सहकारी संस्थांची माहिती देणारें अत्यंत उद्‌बोधक असें वार्षिक त्यांच्या परिश्रमानें अलीकडे प्रसिद्ध झालें होतें. हिंदी सहकारी संघटनाबाबत अधिकारी वाणीनें बोलण्याचा व लिहिण्याचा मान त्यांनीं प्राप्त करून घेतला होता आणि ते आपला पुष्कळसा वेळ ह्या कामींच खर्चीत असत. हिंदी शेतकऱ्यांचें व कारागिरांचें आर्थिक जीवन सहकारी पद्धतीनें कसें सुधारतां येईल ह्याच्या विवेचनेंत त्यांचा बहुतेक काळ जात असे. सरकारी व बिगर-सरकारी सहकारी त्यांचा सल्ला घेत आणि तेहि हिंदुस्थान सरकार, रिझर्व्ह बँक व प्रांतिक सरकार ह्यांच्या आर्थिक व कारभारविषयक धोरणावर विधायक टीका करून त्यांस मार्गदर्शन करीत. असा अखिल भारतीय नेता नाहींसा झाल्यानें हिंदी सहकारी चळवळीची अपरिमित हानि झालेली आहे आणि ती भरून निघणें अत्यंत कठीण आहे.

---

### कोंकणांतील भाताचें पीक वाढविण्यासाठी प्रयत्न

#### भुइमुगाच्या पेंडीच्या खताचा प्रसार

कोंकणांतील तांदळाचें दर एकरीं उत्पादन अत्यंत कमी आहे, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. हें उत्पादन वाढविण्याचा एक मार्ग खतांचा उपयोग, हा आहे. भुइमुगाच्या पेंडीच्या ४,००० टन खताचा रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांत प्रसार करण्याची योजना तयार आहे. ह्या जिल्ह्यांत बंदरांचें ठिकाणीं डेपो उघडण्यांत येणार आहेत. सरकार प्रत्येक टनास ४० रुपयांची मदत करणार आहे. पेंडीचा भाव ७५ रुपयांस टन ह्याप्रमाणें निश्चित केलेला आहे. म्हणजे, शेतकऱ्यास १२ आण्यांस १ मण (१४ शेर) ह्या दरानें हें खत मिळूं शकेल. भाताच्या पिकासाठींच ह्या खताचा उपयोग केला पाहिजे व दर एकरीं ४२५ पौंड खत निश्चित केलेलें आहे. दर एकरामागे १२ रुपये ज्यास्त खर्चल्यास उत्पादन सवापट होऊन ३५ रुपयांची जादा प्राप्ती होऊं शकेल, अशी अपेक्षा आहे.

---

महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक

**न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.**

( हेड ऑफिस : मुंबई )

अधिकृत भांडवल : १०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.

**एकूण खेळतें भांडवल : ९५,००,००० रु.**

—: शाखा :—

सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.

D. N. Gandekar, B.A., LL.B. पुणें ब्रँच मॅनेजर

D. D. Deshpande, B.A. मॅनेजिंग डायरेक्टर

॥ दत्त कंपनी ॥

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेळेवर रिपेअर करून मिळतील.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

**मागोरा पिल्स**

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय

**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

## पुणें सें. को. बँक लि.

**" सर परशुरामभाऊ कॉलेज " शाखेचें उद्घाटन**

पुणें सें. को. बँकेच्या " सर परशुरामभाऊ कॉलेज " शाखेचा उद्घाटन समारंभ पाडण्याचे सुमुहूर्तावर शनिवार ता. २५ रोजीं प्रो. वा. गो. काळे ह्यांचे हस्तें झाला. समारंभास प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या, श्री. वैकुंठराय मेहता, प्रि. धनंजयराव गाडगीळ, श्री. बा. सी. कामत, इत्यादींचे संदेश आले होते. पुणें सें. को. बँकेचे अध्यक्ष, रावसाहेब खोले, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत बँकेच्या प्रगतीचें दिग्दर्शन करून बँकेनें स्थानिक जनतेंत बँकिंगच्या व्यवहारांची आवड निर्माण करण्यांत कसा पुढाकार घेतला हें सांगितलें व नव्या शाखेचे मार्फत सर परशुरामभाऊ कॉलेजचे विद्यार्थी व त्या भागांतील रहिवासी ह्यांची सेवा करण्याची बँकेस संधी मिळत असल्या-बद्दल संतोष व्यक्त केला. प्रिन्सिपॉल करमरकर व प्रो. औतुरकर ह्यांच्या समयोचित भाषणानंतर प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं थोडेसें विस्तृत भाषण करून, मध्यवर्ती बँकांना ह्यापुढें उज्ज्वल काळ असल्याचें सांगितलें. समाजाची गरज भागवून त्याची सेवा करण्याचें सहकारी बँकांचें ध्येय असतें, त्याप्रमाणें पुणें सें. को. बँकेनें किती महत्त्वाचें कार्य केलें आहे, त्याचें त्यांनीं वर्णन केलें. " सर परशुरामभाऊ कॉलेज " शाखेचें उद्घाटन जाहीर करून व तिला यश चिंतून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. श्री. व्ही. जे. करंदीकर ह्यांनीं आभार मानल्यावर सभेचें काम संपलें.

## डेक्कन जिमखाना को. कंझ्यूमर्स सोसायटी लि.

**उद्घाटन समारंभ**

डे. जि. को. कंझ्यूमर्स सोसायटीचा उद्घाटन समारंभ पाडण्याचे सुमुहूर्तावर, शनिवार ता. २५ रोजीं, प्रो. पी. जी. दाणी यांच्या हस्तें पार पडला. त्या प्रसंगीं सोसायटीचे चेअरमन, श्री. एस. टी. पपु, ह्यांनीं सुंदर भाषण करून सोसायटीच्या कार्याची व सभासदांवरील जबाबदारीची माहिती करून दिली. सभासदांस मार्गदर्शक म्हणून त्यांनीं " दहा आज्ञा " वाचून दाखविल्या, त्या येथें उद्धृत केल्या आहेत.

**कंझ्यूमर्स सोसायटीच्या सभासदांसाठी " दहा आज्ञा "**

(१) सोसायटीच्याच दुकानीं सर्व माल खरेदी करा. (२) खासगी दुकानदारांच्या आमीषांना बळी पडूं नका. (३) सोसायटीचे भाग खरेदी करून तिला शक्य तें सहाय करा. ( ४ ) सोसायटीचे सभासद होण्याविषयीं आपल्या शेजाऱ्यांचें मन वळवा. ( ५ ) सोसायटीचें ध्येय व तत्त्व हीं माहीत करून घेण्यापूर्वी तिचेवर टीका करूं नका. ( ६ ) आपली कांहीं तक्रार असल्यास तिचा निष्कारण बोभाटा व बभ्रा न करतां ती कमिटी-कडे खुलासेवार लेखी कळवा. ( ७ ) सहकारी चळवळीची माहिती देणारीं वृत्तपत्रें काळजीपूर्वक वाचीत जा. ( ८ ) नेहमी रोखीनें व्यवहार करा. ( ९ ) नेहमी सोसायटीच्या हिताचे दृष्टीनें आपलें मत नोंदवा ( १० ) सोसायटीच्या साधारण सभांस हजर राहून, आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा तिला द्या.

ह्या सेरीज, ( १ ) नेहमी मोड घेऊन सोसायटीच्या दुकानांत जा व ( २ ) रेशनच्या ठराविक दिवशीं, न चुकतां, आपलें रेशन न्या, अशा दोन व्यावहारिक सूचनाहि श्री. पपु ह्यांनीं केल्या.

## ग्रेटब्रिटनमधील येण्याची वसुली

" हिंदुस्थानाच्या ग्रेटब्रिटनमधील येणें शिल्लक वाढत आहेत, तो हिंदुस्थानानें पुरविलेल्या मालाचा व केलेल्या कामाचा मोबदला आहे हें खरें असलें तरी हिंदुस्थानाचें स्वास्थ्य बिघडवूं पहाणाऱ्या शत्रूच्या प्रतिकारासाठीं त्याचा उपयोग केला गेलेला आहे हें विसरतां कामा नये. ग्रेट ब्रिटननें हें देणें भागविण्याचें म्हटलें म्हणजे तेथील निर्यात मालाच्या कांहीं उद्योगधंद्यांस भरपूर काम मिळेल हें उघड आहे. परंतु, त्याचा ग्रेट ब्रिटनला फायदा काय ? हिंदुस्थान आज युद्धखर्च करीत आहे, त्याचा बराच मोठा भाग ब्रिटिश माल आयात करून त्यास परत मिळवितां येईल, असें म्हणणारांनीं ग्रेट ब्रिटन किती काळ आपला माल हिंदुस्थानाकडे फुकट पाठवूं शकेल, ह्याचा विचार केला पाहिजे. " फिनॅन्शिअल टाइम्सनें हिंदुस्थानाच्या ग्रेट ब्रिटनमधील येण्यावर वरील प्रकारचे विचार व्यक्त केले आहेत. हिंदुस्थानानें युद्धखर्च केला, तो मुख्यतः स्वतःवरील आपत्ती टाळण्यासाठी केला व आज ग्रेट ब्रिटन हिंदु-स्थानचा देणेकरी दिसत असला तरी वरील गोष्ट लक्षांत घेऊन आणि ग्रेट ब्रिटनची माल विनामूल्य बाहेर पाठविण्याची मर्यादित शक्ति ध्यानांत बाळगूनच कर्जफेडीच्या प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे, हा वरील म्हणण्याचा मथितार्थ आहे.

## कपाशीच्या सहकारी विक्रीच्या सोसायट्या

जरीला कपाशीच्या बियांचा प्रसार करण्यासाठी व जरीला कपाशीची विक्री करण्यासाठी कपास विक्रीच्या सहकारी सोसा-यट्या पूर्व खानदेश जिल्ह्यांत स्थापन करण्यांत आल्या आहेत. त्यांपैकीं आठ सोसायट्या १९४२ सालीं व सात सोसायट्या १९४३ सालीं सुरू झाल्या. १९४२ सालीं स्थापन झालेल्या आठ सोसायट्यांनीं १९४२-४३ च्या मोसमांत २,२८,७५५ रुपयां-च्या ५,८२७ मण कपाशीची व ४८,६४९ रुपये किंमतीच्या १०,६०७ मण कपाशीच्या बियांची विक्री केली. सबंध मोसमभर कपाशीची विक्री चालू असते व मोसमाचे अखेर सरासरीनें हिशेब करून प्रत्येक सभासदास त्याच्या मालाचे पैसे त्याच्या सोसायटी मार्फत दिले जातात. १९४२-४३ च्या मोसमांत सभासदांना प्रत्येक मणामागें १० ते २० रुपये ज्यास्त मिळूं शकले, ह्यावरून सहकारी विक्रीच्या योजनेचा फायदा लक्षांत येईल.

## सैनिकांसाठी सहकारी प्रचंड योजना

युद्धसमाप्तीनंतर मोकळ्या होणाऱ्या हिंदी सैनिकांसाठी संर-क्षण खात्याचा एक भाग म्हणून, सहकारी योजना आखून त्या पार पाडण्याकरितां सबंध हिंदुस्थानाकरितां एक को-ऑपरेटिव्ह कौन्सिलची स्थापना करावी, अशी संरक्षण खात्याचे प्रमुख, सर फिरोझखान नून, ह्यांची कल्पना आहे. सायकलीचे सुटे भाग, कपडे, बूट, पट्ट्याळें, इत्यादींचें उत्पादन त्याचप्रमाणें फळबागा लावणें, फळें बाटल्यांत भरून सांठवणें, इत्यादि उद्योग सहकारी तत्त्वावर चालू करतां येतील. शेतीच्या व इतर मालाची विक्रीहि सहकारी पद्धतीनें सुरू करणें, सैनिकांसाठी स्वतंत्र सहकारी सेव्हिंग्ज बँक स्थापन करणें, इत्यादिहि त्यांच्या सूचना आहेत. त्या सर्वांची व्यवहार्यता अर्थातच आतांपर्यंतच्या अनुभवावरून ठरविली पाहिजे.

**पूना मर्चंटस को. बँक लि.**

वरील बँकेच्या डायरेक्टरांनीं आपल्या सभासदांस व हित-चिंतकांस पाडव्याचे दिवशीं पानसुपारीस बोलाविलें होतें.

**खादीच्या प्रसारासंबंधीं अ. भा. चरखा संघाचें धोरण**

प्रत्येक कुटुंबास कापडापुरतें खादीचें द्वारा स्वयंपूर्ण करणें व कपास पेरणारांपासून खादी विणणारांपर्यंतच्या सर्वांचे, विशेषतः अगदीं कमी वेतन मिळविणाऱ्या सूत काढणारांचें, हितसंवर्धन करणें हें अ. भा. चरखा संघाचें पहिल्यापासूनचें ध्येय आहे. तथापि संघानें आतापर्यंत खादीचें उत्पादन व तिचा प्रसार करून खादी-संबंधांतील आर्थिक तत्वज्ञानकडे लोकांचें लक्ष. वेधण्याचेंच काम मुख्यतः केलें. त्यामुळें, मूळ उद्देशाकडे सहाजिकच पुरेसें लक्ष दिलें गेलें नाहीं. खादीचें उत्पादन व खप ह्यांची वाढ त्यासाठीं ठिकठिकाणीं सहकारी सोसायट्या काढून करावी व संघानें त्या सोसायट्यांच्या कामास मदत करावी, असें नवें धोरण संघानें जाहीर केलें आहे.

**युद्धोत्तर वैमानिक वहातुकीची योजना**

युद्धोत्तर हिंदुस्थानांतील वैमानिक वहातुकीची पांच वर्षांची योजना सर महमद उस्मान ह्यांच्या खात्यानें तयार केली आहे. वार्षिक वहातुकीत अंतराचे संबंधांत पांच पट वाढ व माल वहाण्याचे संबंधांत पंधरा पट वाढ ह्या योजनेंत अंतर्भूत आहे. ह्या योजनेस भांडवली खर्च १३ कोटि रुपये येईल व वार्षिक खर्च २ कोटि, ५२ लाखांवरून उतरत जाऊन पांचव्या वर्षी तो १ कोटि, ९० लाख रुपये होईल. पहिल्या वर्षी योजनेस १ कोटि, ६० लक्ष रुपये तूट येईल, परंतु पांच वर्षांचे अखेरीस ती १२ लाखांचा फायदा दाखवूं लागेल, अशी अपेक्षा आहे.

**हिंदुस्थानांतील स्त्री-डॉक्टर**

हिंदुस्थानांतील ४० कोटि लोकसंख्येस उपचार करण्यासाठी १९४० सालीं फक्त ४० हजार डॉक्टर होते. म्हणजे १० हजार लोकांस एक डॉक्टर असें प्रमाण पडलें. ग्रेटब्रिटनमध्यें हें प्रमाण एक हजार लोकांस एक डॉक्टर असें पडतें. हिंदुस्थानांतील ४० हजार डॉक्टरांपैकीं फक्त २ हजार स्त्रिया आहेत व त्यांपैकीं निम्म्यासुद्धां विश्वविद्यालयाच्या पदवीवर नाहींत. हिंदी स्त्री पदवीधर डॉक्टरांपैकीं एक पंचमांश दिल्लीच्या लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेजमधून पास झालेल्या आहेत.

**आयातींत प्राधान्य मिळणाऱ्या वस्तू**

कोणत्या मालाच्या आयातीस हिंदुस्थान सरकार प्राधान्य देतें हें अधिकृत रीत्या सांगतांना सरकारच्या प्रतिनिधीनें, स्त्रिया ओठ रंगविण्यासाठी वापरत असलेल्या लिपस्टिकच्या आयातीचा उल्लेख केला. लिपस्टिकसारख्या वस्तू जनतेच्या अत्यावश्यक गरजांचे सदरांत येत नसल्या, तरी युद्धपरिस्थितीच्या तीव्रतेचा विसर पाडून प्रसन्नता कायम राखण्यास त्यांचा उपयोग होतो, असें त्यांनीं सांगितलें.

**अँग्लो इंडियनांचें युद्धोत्तर योजनेंत स्थान**

युद्धसमाप्तीनंतर परतणाऱ्या अँग्लो-इंडियन सैनिकांच्या नोकरीची सोय पहाण्यांत कसूर होतां कामा नये व देशाच्या आपत्तींचे काळीं त्याचे सहायास धावून गेलेल्यांचा युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेचे योजनेंत विसर पडतां कामा नये, असें मि. फ्रँक अँन्थनी ह्यांनीं नागपूर येथील आपल्या भाषणांत सांगितलें.

**ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च**

गेले कांहीं आठवडे ग्रेट ब्रिटनचा रोजचा युद्धखर्च सुमारें २२३ कोटि रुपये झाला, असें ब्रिटिश फडनवीसांनीं कॉमन्स सभेंत नुकतेंच सांगितलें.


२२ वा आठवडा !

'प्रकाश' पिक्चर्सचा मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक—विजय भट्ट

भूमिकाः शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

श्रीकृष्ण, पुणें दररोज ३ खेळ ३–६॥ व १० वा.

— एव्हरग्रीन प्रकाशन —

८ वा आठवडा !

प्रकाश पिक्चर्सकृत – एव्हरग्रीन रिलीज–

पनघट

भूमिका :—

रत्नमाला, उमाकांत, जीवन

—ग्लोब पुणें—

रोज २ खेळ ६॥ व १० वा.

शनि. रवि. सोम. दु. ३॥ वाजतां जादा खेळ

मुक्काम

आणखी एक आठवडा वाढला !

१५ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

महात्मा विदुर

भू.—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे नायमपल्ली, मनोहर घटवाई, प्रल्हाद

आर्यन, पुणें दररोज तीन खेळ ३॥, ६॥ व १० वाजतां


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.